मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पायाभूत सुविधांमुळे विकासाला चालना मिळेल

## अमृत भारत स्टेशन योजना ही एक महत्त्वपूर्ण योजना : शंकर जगताप

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**



अमृत भारत स्टेशन योजना ही रेल्वे क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण योजना आहे. या योजनेतून रेल्वे स्टेशन आधुनिक सुविधांनी युक्त होतील आणि प्रवाशांना चांगल्या प्रवासाचा अनुभव मिळेल. या योजनेमुळे देशाच्या आर्थिक विकासालाही चालना मिळेल, असे प्रतिपादन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.अमृत भारत स्टेशन योजनेच्या अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते देशभरातील ५५४ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास, १५०० रोड ओव्हर ब्रिज आणि अंडरपासचे भूमिपूजन तसेच उद्घाटन करण्यात आले. या योजनेच्या अंतर्गत पुणे मंडलाच्या चिंचवड रेल्वे स्थानकाचाही समावेश आहे. एकू २०.४४ कोटींच्या पुर्नविकासाच्या कामाचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन उदघाटन झाले. त्यावेळी शहरवासियांना शुभेच्छा देतांना चिंचवड रेल्वे स्थानक परिसरात आयोजित कार्यक्रमात शंकर जगताप बोलत होते. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, भाजपचे मावळ लोकसभा संयोजक सदाशिव खाडे, पुणे मंडलाच्या प्रबंधक इंदू दुबे, प्रदेश निमंत्रित सदस्य महेश कुलकर्णी, प्रवक्ते राजू दुर्गे, भाजपा सरचिटणीस नामदेव ढाके, अजय पाताडे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळूराम बारणे, माजी उपमहापौर केशव घोळवे, नगरसेवक राजेंद्र गावडे, नगरसेविका मीनाताई कुलकर्णी, आरतीताई चोंधे, सविता खुळे, बेटी बचाव बेटी पढाओ संयोजिका प्रीती कामतिकर, मंडल अध्यक्ष सोमनाथ भोंडवे, निलेश अष्टेकर, संतोष तापकीर, योगेश चिंचवडे, दीपक भोंडवे, सिद्धेश्वर बारणे, शेखर चिंचवडे, देवदत्त लांडे, सांस्कृतिक आघाडी संयोजक विजय भिसे, मधुकर बच्चे, राजश्री जायभाय, प्रकाश जवळकर, निता कुशारे, सचिन काळभोर, बाळासाहेब भूंबे, रवींद्र नांदुरकर, पल्लवी मारकड, पल्लवी पाठक, पल्लवी कोल्हापुरे, सज्जाद तांबोळी, मनिषा शिंदे आदी पदाधिकारी तसेच रेल्वे विभागाचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विकसित भारत आणि विकसित रेल्वे या विषयावर आयोजित चित्रकला स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. सदर देशभरात २ हजारहून अधिक ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आहे होते. यास ४० लाखाहून अधिक नागरिकांनी ऑनलाईन उपस्थिती दर्शविली.शंकर जगताप म्हणाले की, अमृत भारत स्टेशन योजनेच्या अंतर्गत मुंबई पुणे रेल्वेमार्गावर असलेल्या चिंचवड रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासासाठी रु. २०.४४ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. शहराच्या बाजूने प्रवेशद्वार येथे नवीन प्रवेश लॉबीसह मुख्य प्रवेशद्वार गेट, नवीन पोर्टिको देऊन मोहोर सुधारणा करण्यात येणार आहे. ज्यामध्ये सुधारित शौचालये, पाणी बूथ, एटीएम यांसारख्या अनेक सुविधा असणार आहेत. पार्किंग सुविधांसह फिरणाऱ्या क्षेत्राचा विकास आणि लँडस्केपिंगसह पार्किंगपासून प्रवेशद्वारापर्यंत झाकलेला पादचारी मार्ग विकसीत करण्यात येणार आहे. ०४ लिफ्ट आणि ०२ एस्केलेटरची तरतूद करण्यात आली आहे. प्लॅटफॉर्मवर पूर्ण झाक (सुमारे २००० चौरस मीटर) प्लॅटफॉर्मची सुधारणा, प्लॅटफॉर्ममध्ये बसण्याची क्षमता वाढविण्यासाठी अतिरिक्त मॉड्यूलर फर्निचर तयार करण्यात येणार आहे. प्रत्येक प्लॅटफॉर्मवर नवीन सुधारित शौचालये आणि पाण्याची व्यवस्था, दिव्यांगजन अनुकूल शौचालये, तसेच लिफ्ट, रॅम्प आणि वेगळी पार्किंग यासारख्या इतर सुविधा, संपूर्ण स्थानिक परिसराची रोषणाई सुधारणा, सर्व खोल्या आणि फिरणाऱ्या क्षेत्राचा समावेश, कोच निर्देश फलक, व्हिडिओ डिस्प्ले युनिटसह रेल्वे माहिती प्रणाली आणि सुधारित सांकेतिका, दोन्ही प्रवेशद्वार, पाणी बूथ, शौचालये येथे असलेल्या विद्यमान बुकिंग कार्यालयाचे नूतनीकरण, कंपाऊंड वॉल यासह स्थानिक कला आणि संस्कृती समाविष्ट करणे, पर्यटकांसाठी स्थानिक आकर्षणांची माहिती, इतिहास इत्यादी. शिल्प, पेंटिंग, भिंतीचित्रे, माहितीपूर्ण प्रदर्शने इत्यादींचा समावेश आहे. शंकर जगताप म्हणाले की, देशातील १५०० रोड ओव्हर ब्रिज आणि अंडरपासच्या उद्घाटनामुळे रेल्वे आणि रस्ते वाहतुकीतील समन्वय सुधारण्यास मदत होईल. यामुळे प्रवासाचा वेळ कमी होईल आणि अपघातांचे प्रमाण कमी होईल. या योजनेमुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल, यात बांधकाम क्षेत्रातील कामगार, तसेच रेल्वे आणि इतर संबंधित क्षेत्रातील रोजगारांचा समावेश आहे. रेल्वे पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्याने देशाच्या आर्थिक विकासाला गती होवून यामुळे व्यापार आणि उद्योगांना चालना मिळेल आणि देशाची प्रगती होईल.'आत्मनिर्भर भारत' अभियानाला गती मिळणार असून, यातून देशातील तंत्रज्ञान आणि कौशल्यांचा वापर करून रेल्वे क्षेत्रात प्रगती करण्यावर भर दिला आहे. सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारच्या प्रयत्नांवर भर दिला आहे. भारतीय रेल्वेच्या इतिहासात एक महत्वाचा टप्पा आहे. यातून रेल्वे प्रवाशांसाठी अनेक नवीन सुविधा उपलब्ध होणार आहेत, रेल्वे क्षेत्रात सुधारणा होण्यास मदत होईल.

# महात्मा फुले महाविद्यालयात मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात

## कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी राजभाषा गौरव दिन कार्यक्रम

**। पिंपरी-चिंचवड।**

रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात मराठी विभाग, ग्रंथालय विभाग आणि रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या संयुक्त विद्यमाने कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी राजभाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.विक्रांत शेळके आणि विशाल खोंदले उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.माधव सरोदे तर रयत विद्यार्थी मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे ह्यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रा.विक्रांत शेळके यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानातून कवितेची निर्मिती, कवितेची आस्वाद प्रक्रिया, कवितेचे विविध पैलू अशा विविध बाबींवर मार्गदर्शन करत 'कविता म्हणजे मानवी मनाचा पहिला हुंकार असतो.' असे प्रतिपादन केले. आपल्या व्याख्यानातून त्यांनी कविता कशी घडते ते आपल्या स्वलिखित कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखविले. विशाल खोंदले यांनी विनोदी कवितेचे विश्व आपल्या स्वलिखित कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या समोर उलगडून दाखवत सध्याच्या धावपळीच्या जगात विनोदी कवितेमुळे मानवी आयुष्य स्वछंदी कसे जगता येते याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी आपल्या मनोगतातून मराठी भाषा सध्याच्या काळात टिकवण्यासाठी आणि पुढे नेण्यासाठी सर्व मराठी भाषकांनी मराठी भाषेचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात कशा प्रकारे केला पाहिजे याबद्दल मार्गदर्शन केले.उपप्राचार्य डॉ.मृणालिनी शेखर यांनी आपली उत्स्फूर्त कविता सादर करीत कवी कुसुमाग्रजांच्या मराठी साहित्यसेवेचा आढावा आपल्या मनोगतातून मांडला. तर प्राचार्य प्रो.डॉ.माधव सरोदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मराठी भाषेचे इतर भाषांपेक्षा असलेले वेगळेपण सांगत सध्याच्या काळात मराठी भाषेच्या विकासासाठी आपण विशेष प्रयत्न केले पाहिजे असे मत व्यक्त केले.

# 'संघर्षयात्री' पुस्तक प्रेरणादायी : शरद पवार

## संघर्षयात्री हे पुस्तक नव्या पिढीस प्रेरणा देणार आहे

**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**



पिंपरी- चिंचवडमध्ये रोजगारासाठी देश आणि राज्यातून नागरिक येतात. त्यातील एक गजानन बाबर हे एक होते. पैश्यासाठी नाही, तर दोन वेळेचे जेवण व रात्रीच्या निवारासाठी ते रेशन दुकानात काम करत. सर्वसामान्याच्या संकटाच्या काळात ते संकटमोचक म्हणून धावून जात. प्रतिकूल प्रतिपरिस्थितीत त्यांनी सर्वसामान्यांसाठी संघटना उभी केली. नागरिकांची छोटी-मोठी कामे करीत, त्यांच्याशी सुसंवाद वाढवत सामाजिक कार्यास सुरुवात केली. ते नगरसेवक, आमदार व खासदार झाले. त्याची संघर्षमय कथा सांगणारे हे पुस्तक नव्या पिढीस प्रेरणा देणार आहे, असे प्रतिपादन माजी केंद्रीय कृषिमंत्री खासदार शरद पवार यांनी सोमवारी (दि.२६) केले. शिवसेनेचे माजी खासदार गजानन बाबर यांच्या जीवनावरील 'संघर्षयात्री' या पुस्तकाचे प्रकाशन शरद पवार व शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांच्या हस्ते चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे झाले, या वेळी ते बोलत होते. व्यासपीठावर खासदार श्रीनिवास पाटील, डॉ. अमोल कोल्हे, माजी आमदार विलास लांडे, गौतम चाबुकस्वार, महादेव बाबर, शिवसेनेचे मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील, भगवान वाल्हेकर तसेच, सूरज बाबर, प्रकाश बाबर, धीरज बाबर, अमित बाबर, योगेश बाबर, सुमीत बाबर आदी उपस्थित होते. शरद पवार म्हणाले, की यशवंतराव चव्हाण आणि बाळासाहेब ठाकरे हे दोन मोठे नेते महाराष्ट्रात होऊन गेले. त्यांनी सर्वसामान्य तरुणांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना प्रोत्साहन दिले. त्यांचे कर्तृत्व समाजासमोर आणले. बाळासाहेबांच्या प्रोत्साहनामुळे गजानन बाबर घडले. बाबर यांनी सामाजिक बांधिलकी कधी सोडली नाही. खासदार अमोल कोल्हे म्हणाले, की दिल्लीसमोर झुकणाऱ्यांचा नाही, तर छाती पुढे करून लढणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सांगितला जातो. महाराष्ट्र कधी दिल्लीसमोर झुकला नाही. तो आजही छातीचे कोट करून उभा आहे. आजही महाराष्ट्र संघर्षासाठी तयार आहे आणि तो युद्ध जिंकल्याशिवाय गप्प बसणार नाही. माझी कंपनी असून, तेथे ३ हजार जण काम करतात, असे विलास लांडे यांनी आपल्या भाषणात सांगितले. तो धागा पकडून शरद पवार यांनी त्यांच्यावर गुगली टाकली. लांडे यांची इतकी मोठी कंपनी असल्याचे आजच मला कळाले. त्यामुळे माझ्या डोक्यावरील ओझे कमी झाले आहे. शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांना निवडणुकीसाठी निधीची कमतरता होती. त्याच्या पुरवठ्याची काळजी आता मिटली आहे. ते ती बाजू सांभाळून कोल्हेंचे पाठीराखे होतील, असे शरद पवार यांनी जाहीर करताच सभागृहात एकच हश्या पिकला.सन १९७२ पासून शिवसेनेत असलेल्या गजानन बाबर यांनी कायम संघर्ष केला. ते आज हयात असते तर, आताही त्यांना संघर्ष करावा लागला असता. कोणासमोर वाकणार नाही, झुकणार नाही, मोडणार नाही अनं स्वतः ला विकणार नाही, ही बाळासाहेबांची शिकवण शिवसैनिकांमध्ये भिनली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी पुरंदरच्या तहात २३ किल्ले दिले. शिवसेनेने ४० व शरद पवारांचे ४० आमदार तिकडे गेले. काँग्रेसचा १ आमदार गेला. आता ८१ नाही, तर तब्बल १८१ आमदार घेऊ, असा विश्वास शिवसेना नेते संजय राऊत यांनी व्यक्त केला.

# छट पूजेसाठी अतिरिक्त जागा उपलब्ध करून द्या!

## राज्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची महापालिका आयुक्तांना सूचना

**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

चिंचवड येथील पवना नदीकाठी मोठ्या संख्येने उत्तर भारतीय समाज छट पूजा करू शकेल, एवढी जागा वर्षात केवळ दोन दिवसांसाठी (प्रत्येक वर्षी नोव्हेंबरमध्ये) उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी हनुमान मित्र मंडळ आणि छट पूजा समितीचे कार्याध्यक्ष विजय गुप्ता यांनी नुकतीच राज्याच्या विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत राज्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना जागा उपलब्ध करून देण्याबाबत सूचना केली आहे. निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड



शहरात अडीच लाख उत्तर भारतीय नागरिक वास्तव्य करीत आहेत. उत्तर भारतीय समाजाचे शहरातील विकासात मोठे योगदान आहे. समाजाचा धार्मिक कार्यक्रम छट पूजा हा सण इंद्रायणी आणि पवना नदीकाठी गेली ३० वर्षापासून नियमितपणे दरवर्षी उत्साहात साजरा केला जातो. पिंपरी चिंचवड महापालिकेकडून चिंचवड परिसरात पवना नदीकाठी उत्सवासाठी तात्पुरती व्यवस्था केली जाते. परंतु, जागेअभावी आणि जमणाऱ्या असंख्य भक्तांच्या गर्दीमुळे येथील हॉटेल रिव्हरविव्ह जवळील पवना नदी घाट उत्सवासाठी अपुरा पडत आहे. चिंचवड आणि पिंपरी मतदार संघातील मोहननगर, दळवीनगर, चिंचवड, काळभोरनगर परिसरातील हजारोंच्या संख्येने भक्त, भाविक या घाटावर छटपूजेला येतात. अपुऱ्या जागेमुळे वादविवाद होतो. शिवाय गर्दी होते. अपुऱ्या जागेमुळे अपघाताचीही शक्यता बळावते. या घाटाच्या अगदी उजव्या बाजूला शासनाची मोकळी पडीक जागा आहे.

# सुप्रिया सुळेंसाठी शरद पवार मैदानात

## लोकांना भाजप विरोधात पर्याय हवा आहे : शरद पवार

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर प्रतिष्ठेच्या झालेल्या बारामती लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघाचा आढावा शरद पवार यांनी मंगळवारी घेतला. सहाही विधानसभा मतदारसंघातील प्रश्न पवार यांनी जाणून घेतले. सकाळी दहा वाजता सुरू झालेले बैठकांचे सत्र सायंकाळी सात वाजता संपले. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट विकासासाठी नाही. काळ कठीण असला तरी तो पुढे सोपा होईल त्यासाठी एकजूटीने काम करा, असा सल्ला पवार यांनी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना दिला.राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर बारामती लोकसभा मतदारसंघ चर्चेत आला आहे. विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित




पवार यांच्या पत्नी सुनेत्रा या निवडणुकीच्या रिंगणात उभे राहण्याची शक्यता आहे. बारामतीमधील राजकीय वातावरण तापण्यास सुरूवात झाली असतानाच पवार यांनी भोर- वेल्हा- मुळशी, इंदापूर, खडकवासला, पुरंदर, बारामती आणि दौंड या बारामती लोकसभा मतदारसंघाअंतर्गत येत असलेल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेतला. खासदार सुप्रिया सुळे, जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यावेळी उपस्थित होते. प्रत्येक विधानसभा निहाय पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांबरोबर पवार यांनी चर्चा केली. स्थानिक समस्या जाणून घेत मार्गदर्शन केले. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुट विकासासाठी झालेली नाही. आगामी काळात एकत्रित काम करावे लागेल. प्रत्येक मतदारसंघात कमीत कमी दीडशे ते दोनशे कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी आणि विविध संस्थांचे पदाधिकारी एकत्रित आहेत. लोकांना भाजप विरोधात पर्याय हवा आहे. त्यामुळे ती पूर्ण करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे, असे पवार यांनी सांगितले या सर्व घडामोडी दरम्यान लोकसभा निवडणुकीला काहीच दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला असताना अजित पवार, सुनेत्रा पवार हे बारामती लोकसभा मतदारसंघातील अनेक भागात दौरे आणि मेळावे घेत आहेत. यामुळे सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होणार असे जवळपास निश्चित मानले जात आहे. यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले असून त्या पार्श्वभूमीवर बारामती लोकसभा मतदारसंघात येणार्या विधानसभा मतदार संघनिहाय पुण्यातील मार्केटयार्ड येथील निसर्ग मंगल कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीला सुरवात झाली आहे. तर या बैठकीला खासदार सुप्रिया सुळे या देखील उपस्थित आहेत. त्याच दरम्यान मनसेचे नेते वसंत मोरे यांनी शरद पवार यांची भेट घेतली.त्या भेटीनंतर वसंत मोरे म्हणाले की, कात्रज डेअरीच्या मागील बाजूस असलेल्या जागेत पुणे महापालिका आयुक्तांमार्फत चुकीचे आरक्षण टाकण्यात आले आहे. त्या संदर्भात सह्यांची मोहीम हाती घेऊन नागरिकांमध्ये प्रबोधन केले जात आहे. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे देखील हा प्रश्न मांडला. पण काही मार्ग निघाला नाही.

### समस्या जाणून घेत मार्गदर्शन केले

» विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा या निवडणुकीच्या रिंगणात उभे राहण्याची शक्यता आहे. बारामतीमधील राजकीय वातावरण तापण्यास सुरूवात झाली असतानाच पवार यांनी भोर- वेल्हा- मुळशी, इंदापूर, खडकवासला, पुरंदर, बारामती आणि दौंड या बारामती लोकसभा मतदारसंघाअंतर्गत येत असलेल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेतला. खासदार सुप्रिया सुळे, जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यावेळी उपस्थित होते.प्रत्येक विधानसभा निहाय पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांबरोबर पवार यांनी चर्चा केली. स्थानिक समस्या जाणून घेत मार्गदर्शन केले.

# पुणे शहर आणि जिल्ह्यांतील आरोग्य सुविधांमध्ये वाढ होणार

## पुण्यात 'एम्स' उभे राहणार! अजित पवारांची मोठी घोषणा

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
नागपूरमधील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या (एम्स) धर्तीवर एम्सची उभारणी करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी अर्थसंकल्पात केली. या प्रकरणी लवकरच राज्य सरकारकडून केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला प्रस्ताव पाठवला जाणार आहे. औंध येथील जिल्हा रुग्णालयाच्या परिसरामध्ये आरोग्य विभागाची सुमारे ८५ एकर जागा आहे. या जागेत एम्स उभारण्याचे नियोजन आहे. एम्सची उभारणी झाल्यास पुणे शहर आणि जिल्ह्यांतील आरोग्य सुविधांमध्ये वाढ होणार आहे. याचबरोबर पश्चिम महाराष्ट्रातील रुग्णांनाही एम्सचा फायदा होणार आहे. एम्सची उभारणी करण्यासाठी राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाकडून लवकरच केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला प्रस्ताव पाठवला जाणार आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही सुरू होणार असून, जागा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य सरकारकडे असेल, अशी माहिती सूत्रांनी दिली.जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयांवर मोठा ताण



आहे. लोकसंख्येच्या वाढत्या प्रमाणात सरकारी रुग्णालयांची क्षमता अपुरी पडत आहे. ग्रामीण भागातील आणि महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये सुविधा उपलब्ध नसल्याने ससून सर्वोपचार रुग्णालयात मोठ्या प्रमाणात रुग्ण धाव घेतात. त्यामुळे या रुग्णालयावरील ताण वाढत आहे. त्यातच पश्चिम महाराष्ट्रातील हे सर्वात मोठे सरकारी रुग्णालय असल्याने तेथील रुग्णही ससूनमध्ये येतात. औंधमध्ये एम्स सुरू झाल्यास ससूनवरील ताण कमी होऊन रुग्णांना अधिक चांगली आरोग्य सेवा मिळण्यास मदत होणार आहे.लोकसंख्येच्या तुलनेत सरकारी रुग्णालयांमधील अतिदक्षता विभागातील खाटांची संख्या कमी आहे. अतिदक्षता विभागातील खाटांचा विचार करता ससून रुग्णालय ११३, महापालिकेचे कमला नेहरू रुग्णालय १७ आणि जिल्हा रुग्णालय १५ अशी क्षमता आहे. यामुळे अनेकवेळा रुग्णांना अतिदक्षता विभागात दाखल करता येत नाही. एम्समुळे अतिदक्षता विभागातील खाटांची संख्या वाढेल आणि इतर रुग्णालयांवरील ताण कमी होईल.एम्सची उभारणी झाल्यास पुणे शहर आणि जिल्ह्यांतील आरोग्य सुविधांमध्ये वाढ होणार आहे. याचबरोबर पश्चिम महाराष्ट्रातील रुग्णांनाही एम्सचा फायदा होणार आहे. एम्सची उभारणी करण्यासाठी राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाकडून लवकरच केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला प्रस्ताव पाठवला जाणार आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही सुरू होणार असून, जागा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य सरकारकडे असेल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# विज्ञान दिनी विज्ञानप्रेमींना मेजवानी!

## खुला दिवस, शास्त्रज्ञ संवाद अशा विविध उपक्रमांचे आयोजन

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

शहरातील विविध विज्ञान संस्था, शिक्षण संस्थांतर्फे विज्ञानप्रेमींना मेजवानी मिळणार आहे. विज्ञान दिनी (२८ फेब्रुवारी) खुला दिवस, व्याख्याने, विज्ञान प्रदर्शन, शास्त्रज्ञांशी संवाद असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.




आघारकर संशोधन संस्थेत सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत जैवऊर्जा, करंडक वनस्पती, बुरशी, औषधी आणि पीक वनस्पती, जीवाश्म आदींचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. त्याशिवाय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी जैवतंत्रज्ञान, आर्किया आणि विषाणू, करंडक वनस्पती आणि पिकांच्या जाती या विषयांवरील व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. हे कार्यक्रम सर्वांसाठी खुले आहेत.भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेतर्फे (आयसर पुणे) ज्येष्ठ सांख्यिकी भौतिकशास्त्रज्ञ डॉ. दीपक धर, अरविंद गुप्ता यांच्यासह संस्थेतील शास्त्रज्ञांची व्याख्याने होणार आहेत. विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी वैज्ञानिक प्रकल्पांची प्रात्यक्षिके सादर केली जाणार आहेत. त्याशिवाय मलेरियावरील लशीचा शोध, दैनंदिन विज्ञान, विश्वाचा सर्वांत छोटा तुकडा अशा विषयांवरील मार्गदर्शन सत्रे, प्रश्नमंजुषा असे उपक्रम होणार आहेत. इंद्राणी बालन सायन्स ॲक्टिव्हिटी सेंटरमध्ये तयार केलेल्या अभिनव विज्ञान आणि गणित प्रतिकृती पाहता येणार आहेत. आंतरविद्यापीठीय खगोल आणि खगोलभौतिकी केंद्रात (आयुका) खुला दिवस होणार आहे. त्यात संस्था पाहण्यासह विविध दुर्बिणींची प्रारुपे पाहता येतील. आदित्य एल १ ही सौर मोहीम, सूर्य आणि सौरभौतिकी, गुरुत्वीय लहरी, कृष्णविवर आणि लायगो इंडिया, क्वांटम तंत्रज्ञान या विषयांवरील प्रात्यक्षिके, जितेंद्र जोशी यांचे 'सूर्यमंडळाचा प्रवास', स्वर्णिम शिर्के यांचे 'वैश्विक संग्रहालयाची भेट', दिशा सावंत आणि अथर्व पाठक यांचे 'सिटिझन सायन्स', ए. एन. रामप्रकाश यांचे 'आपण आपल्या सूर्याला किती चांगले ओळखतो' अशी व्याख्याने, ॲस्ट्रो ट्रेजर हंटसारखे उपक्रमही होणार आहेत. त्याशिवाय ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर आणि आयुकातील शास्त्रज्ञ यांच्याशी प्रश्नोत्तरांद्वारे संवादही साधता येणार आहे. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेत (एनसीएल) सकाळी साडेदहा वाजता आयआयटी मुंबईतील डॉ. रुची आनंद यांचे व्याख्यान होणार आहे. तसेच विद्यार्थी, वैज्ञानिक आणि कर्मचाऱ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. राष्ट्रीय पेशी विज्ञान संस्थेत (एनसीसीएस) सकाळी साडेदहा वाजता पर्सिस्टंटचे संस्थापक अध्यक्ष डॉ. आनंद देशपांडे यांचे 'व्हाय रीसर्च करिअर इन इंडिया इज सो एक्सायटिंग' या विषयावर व्याख्यान होणार आहे. त्याशिवाय जैवतंत्रज्ञानातील अद्ययावत सुविधा, प्रयोगशाळा पाहण्यासाठी खुल्या असतील.पिंपरी चिंचवड येथील सायन्स पार्कमध्येही विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहे. त्यात शालेय विद्यार्थ्यांच्या विज्ञान प्रकल्पांचे प्रदर्शन, पोस्टर प्रदर्शन, विज्ञान चित्रपट, शास्त्रज्ञांशी संवाद, प्रात्यक्षिके अशा उपक्रमांचा समावेश आहे. राष्ट्रीय रेडिओ खगोलभौतिकी केंद्रातर्फे (एनसीआरए) नारायणगावजवळच्या खोडद येथील जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप येथे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. सकाळी साडेनऊ ते सायंकाळी पाच या वेळेत होणाऱ्या या प्रदर्शनात राज्यभरातील विद्यार्थ्यांचे वैज्ञानिक प्रकल्प मांडण्यात येतील.शहरातील विविध विज्ञान संस्था, शिक्षण संस्थांतर्फे विज्ञानप्रेमींना मेजवानी मिळणार आहे. विज्ञान दिनी (२८ फेब्रुवारी) खुला दिवस, व्याख्याने, विज्ञान प्रदर्शन, शास्त्रज्ञांशी संवाद असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

# थकबाकी न भरल्याने केंद्रीय मंत्र्याची मिळकत सील

## महापालिकेच्या मिळकतकर विभागाकडून थकबाकी वसुलीवर जोर

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

आपल्या वक्तव्यांमुळे कायम चर्चेत असलेल्या केंद्रीय मंत्र्यांच्या मुलाच्या नावाने असलेल्या मिळकतीचा ३ कोटी ७७ लाख रुपयांची मिळकतकराची थकबाकी असल्याने या ठिकाणी असणारे हॉटेल आज महापालिकेने सील केले. त्यामुळे महापालिकेच्या या धडक कारवाईचा राजकीय लोकांनाही दणका बसत असल्याचे स्पष्ट झाले आहे. महापालिकेच्या मिळकतकर विभागाकडून थकबाकी वसुलीवर जोर देण्यात आला आहे. पाच पथकांद्वारे शहराच्या विविध भागात थकबाकी न भरणाऱ्या व्यावसायिक मिळकती सील केल्या जात आहेत. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत बँड वाजवून थकबाकी वसूल करण्यावर भर दिला जात आहे.



शिवाजीनगर विभागाच्या हद्दीत डेक्कन कॉर्नर येथे एक मॉल आहे. या मॉलची एकूण ५ कोटी ६० लाख रुपये थकबाकी होती, त्यापैकी १ कोटी ४० लाख रुपये एका मजल्याची थकबाकी संबंधितांनी भरली. त्यानंतर वरच्या दोन मजल्यांची ३ कोटी ७७ कोटी थकबाकी भरावी यासाठी प्रशासनाकडून वारंवार पाठपुरावा करण्यात आला होता. पण संबंधितांकडून त्यास दाद दिली नव्हती. त्यामुळे आज महापालिकेच्या पथकाने ही मिळकत सील केली आहे. मिळकतकर विभागाचे उपायुक्त माधव जगताप म्हणाले, 'आज दिवसभरात एकूण १६ मिळकती सील करून ८ कोटी रुपये वसूल केले आहेत. त्यापैकी मॉलमधील हॉटेलची ३ कोटी ७७ थकबाकी असल्याने हॉटेल सील केले आहे. पण त्यांनी अद्याप रक्कम भरलेली नाही.महापालिकेच्या पथकाने मॉलमधील हॉटेल सील केले, तो पर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांना ही मिळकत कोणाची आहे याची काहीच माहिती नव्हती. मात्र, थोड्यावेळाने सील काढण्यासाठी दबाव येण्यास सुरुवात झाला. त्यावेळी ही मिळकत केंद्रीय मंत्र्यांच्या मुलाच्या नावाची असल्याचे समोर आले. पण महापालिकेने रक्कम भरल्याशिवाय सील काढणार नाही असे स्पष्ट केल्याने या कारवाईची महापालिकेत चांगलीच चर्चा रंगली होती.